जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID** : crimepress.pune@gov.in **Ph**.020 / 26122478

**प्रेसनोट क्रमांक - ७५७ दिनांक - २३/१०/२०२३**

सहकारनगर पोलीस स्टेशन पुणे शहर

## मोक्का गुन्हयात चार महिन्यापासुन फरारी असलेला आरोपी पर-राज्यात पळुन जाण्याच्या तयारीत असताना शिताफीने केले जेरबंद

दि.२७/०६/२०२३ रोजी,अरणेश्वर आण्णा भाऊ साठे वसाहत,सहकारनगर पुणे येथे दोन गटात झालेल्या भांडणावरून सहकारनगर पोलीस स्टेशन येथे दोन वेगवेगळे गुन्हे दाखल झाले आहेत.त्यामधील सहकारनगर पोलीस स्टेशन गु.र.नं.१४४/२०२३भा.द.वि.क.३९५,३२३,४५२,१४३,१४४,१४७,१४८,१४९,४२७, ५०६(२),आर्म ॲक्ट कलम ४(२५),महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३७(१)(३) सह १३५, क्रिमीनल लॉ अमेंडमेंट ॲक्ट कलम ३ व ७, महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा १९९९ चे कलम ३ (१) (ii), ३(२), ३(४) प्रमाणे दाखल गुन्हयातील काही आरोपी मिळून येत नव्हते.

दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपी यांचा सहाय्यक पोलीस आयुक्त लष्कर विभाग पुणे,श्री.संजय सुर्वे,वरिष्ठ पोलीस निरीक्षक सहकारनगर पोलीस स्टेशन पुणे श्री.सुरेंद्र माळाळे यांचे मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे राहुल खंडाळे व तपास पथकाचा स्टाफ तपास करीत असताना **पोलीस उपनिरीक्षक राहुल खंडाळे, पोलीस अंमलदार सुशांत फरांदे व महेश मंडलीक** यांना बातमी मिळाली की, दाखल गुन्हयातील पाहिजे आरोपी नामे **साहील आनंत काथवटे रा.आण्णा भाऊ साठे वसाहत,अरणेश्वर पुणे** हा त्याचे मित्रास भेटण्यासाठी ओसवाल वॉटर प्लँट शेजारी असलेल्या ओम श्री.बिल्डींग जवळ इंदीरानगर बिबवेवाडी पुणे येथे येणार असुन तो पर-राज्यात पळुन जाण्याच्या तयारीत आहे. लागलीच वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली सदर भागात सापळा लावुन त्यास ताब्यात घेवुन सहकारनगर पोलीस स्टेशन येथे आणुन दाखल गुन्हयात अटक केली आहे.

सदरची कामगिरी मा.अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशीक विभाग,श्री.प्रविणकुमार पाटील मा.पोलीस उपायुक्त परिमंडळ-२, श्रीमती स्मार्तना पाटील,मा.सहा.पोलीस आयुक्त,स्वारगेट विभाग श्री.नारायण शिरगावकर,मा.सहाय्यक पोलीस आयुक्त लष्कर विभाग पुणे श्री.संजय सुर्वे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.सुरेंद्र माळाळे,सहकारनगर पोलीस स्टेशन,पोलीस निरीक्षक (गुन्हे) श्री.संदीप देशमाने यांचे मार्गदर्शनाखाली सहकारनगर पोलीस स्टेशन तपास पथकाचे पोलीस उपनिरीक्षक राहुल खंडाळे, सहा.पोलीस उपनिरीक्षक बापु खुटवड,पोलीस अंमलदार सुशांत फरांदे महेश मंडलिक, बजरंग पवार, नवनाथ शिंदे, सागर कुंभार, भुजंग इंगळे, अमोल पवार, निलेश शिवतारे, सागर सुतकर, विशाल वाघ यांनी केली आहे.


7823025272
7823025239
7823025232
Shri. Sandeep N
Police Insp